**अंगणवाडी सेविका/ मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविका यांना सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढ, भाऊबीज भेट रक्कमेत वाढ करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः- एबावि-२०१७/प्र.क्र.१०३/का-६**

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक : २३ फेब्रुवारी, २०१८**

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.२७/का.६, दि.३० एप्रिल २०१४

(२) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१३/प्र.क्र.३७२/का.६, दि.१९ जानेवारी २०१५

(३) मा.मंत्रिमंडळाचा दिनांक २१ /१२/२०१७ निर्णय

**प्रस्तावना**:- सन १९७५ पासून एकात्मिक बाल विकास सेवायोजना ही केंद्रपुरस्कृत योजना ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या विकासाकडे लक्ष देण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवायोजन,नवी मुंबई कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा व त्याबाबतचे आर्थिक निकष केंद्र शासनाकडून वेळोवेळी मंजूर करण्यात येतात. एकात्मिक बाल विकास सेवायोजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात ५५३ प्रकल्पातंर्गत अंगणवाडी सेविका ९७४७५, मदतनीस ९७४७५ व मिनी अंगणवाडी सेविका १३०११ असे एकूण २,०७,९६१ मानधनी कर्मचारी कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनासाठी केंद्र शासनाकडून ६०% व राज्य शासनाकडून ४०% याप्रमाणे निधी दरवर्षी केंद्रशासनाच्या निकषानुसार मंजूर करण्यात येतो. सध्या अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना केंद्र व राज्य शासन देत असलेल्या मानधनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| मानधनी पदाचे नाव | केंद्र शासनाने पदास मंजूर केलेले मानधन | | | राज्य शासनाने यापुर्वी वेळोवेळी केलेली वाढ एकुण | एकुण मानधन केंद्र शासनाचे+ राज्य शासनाचे (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| | मंजूर मानधन | त्यापैकी केंद्र हिस्सा ६०% | त्यापैकी राज्य हिस्सा ४०% | | |
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.अनुतीर्ण | २९३८ | १७६३ | ११७५ | २००० | ४९३८ |
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.अनुतीर्ण (५ वर्षे अनुभव) | २९६९ | १७८१ | ११८८ | २००० | ४९६९ |
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.अनुतीर्ण (१० वर्षे अनुभव) | ३००० | १८०० | १२०० | २००० | ५००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.उत्तीर्ण | ३००० | १८०० | १२०० | २००० | ५००० |
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.उतीर्ण (५ वर्षे अनुभव) | ३०३१ | १८१९ | १२१२ | २००० | ५०३१ |
| अंगणवाडी सेविका एस.एस.सी.उतीर्ण (१० वर्षे अनुभव) | ३०६३ | १८३८ | १२२५ | २००० | ५०६३ |
| मदतनीस | १५०० | ९०० | ६०० | १००० | २५०० |
| मिनी अंगणवाडी सेविका | २२५० | १३५० | ९०० | १००० | ३२५० |

२. अंगणवाडी सेविका,मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये दरवर्षी वेतनवाढीप्रमाणे वाढ करणेकरिता शासनास शिफारस करण्यासाठी प्रधान सचिव (महिला व बाल विकास) यांच्या अध्यक्षतेखाली सेविकांच्या संघटनेच्या पदाधिकारी यांचा समावेश असलेली समिती दिनांक २० जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांना दिनांक ९ मार्च २०१७ रोजी सादर केला होता.त्यामध्ये सेविकांच्या मानधनात वाढ करणे, सेवासमाप्तीचे वय कमी करणे यासह अनेक शिफारशी केलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कृती समितीकडुन अंगणवाडी सेविका व मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे मानधन वाढविण्याच्या मागणीसाठी दि. ११.०९.२०१७ पासून बेमुदत संप सुरु करण्यात आलेला होता. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्यासमवेत अंगणवाडी संघटनेच्या पदाधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेत दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार सेविकांच्या मानधनात वाढ करणे व सन २०१७-१८ पासून देण्यात येणा-या भाऊबीज भेट रक्कम रुपये १०००/- मध्ये वाढ करुन ती रुपये २०००/- करणे इ. निर्णय जाहिर करण्यात आलेले होते. त्यानुसार अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना आश्वासित केल्याप्रमाणे मानधनात वाढ करणे व भाऊबीज रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- महाराष्ट्र राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार वाढ करणे, सन २०१७-१८ पासून भाऊबीज भेट रुपये २०००/- करणे, अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या सेवासमाप्तीचे वय दिनांक १/४/२०१८ पासून ६५ वरुन ६० वर्षे करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मानधनी कर्मचा-यांचा सवर्ग | पूर्वी अनुज्ञेय मानधन **प्राथमिक** | आता वाढविण्यात येत असलेले **प्राथमिक मानधन** | **दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार** अनुज्ञेय होणारे मानधन एकुण | **सन २०१७-१८** पासून दरवर्षी भाऊबीज भेट | सेवा समाप्तीचे वय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी सेविका | ५००० | १५०० | **६५००+**<br>० ते १० वर्षे = ०<br>११ ते २०वर्षे=३% वाढ<br>२१ ते ३० वर्षे=४% वाढ<br>३१ ते ४० वर्षे=५% वाढ | २००० | ६० वर्षे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मिनी अंगणवाडी सेविका | ३२५० | १२५० | **४५००+**<br>० ते १० वर्षे = ०<br>११ ते २०वर्षे=३% वाढ<br>२१ ते ३०वर्षे=४% वाढ<br>३१ ते ४०वर्षे=५% वाढ | २००० | ६० वर्षे |
| ३ | मदतनीस | २५०० | १००० | **३५००+**<br>० ते १० वर्षे = ०<br>११ ते २०वर्षे=३% वाढ<br>२१ ते ३०वर्षे=४% वाढ<br>३१ ते ४०वर्षे=५% वाढ | २००० | ६० वर्षे |

२. उपरोक्त नमुद विवरणपत्रानुसार दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सेवाजेष्ठतेनुसार खालीलप्रमाणे मानधन वाढ अनुज्ञेय राहील.

| **संवर्ग** | सेवा कालावधी | आता अनुज्ञेय प्रतिमाह प्राथमिक मानधन | आता वाढविण्यात येत असलेले प्राथमिक मानधन | सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय केलेली वाढ टक्केवारी प्रमाणे | दिनांक १.१०.२०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार मानधनाचा प्राथमिक दर |
|---|---|---|---|---|---|
| **अ)** अंगणवाडी सेविका | १० वर्षापर्यंत | ५००० | १५०० | ० | ६५०० |
| | ११ ते २० वर्षे | ५००० | १५०० | ३% | ६६९५ |
| | २१ ते ३० वर्षे | ५००० | १५०० | ४% | ६७६० |
| | ३१ वर्षावरील | ५००० | १५०० | ५% | ६८२५ |

| **संवर्ग** | सेवा कालावधी | आता अनुज्ञेय प्रतिमाह प्राथमिक मानधन | आता वाढविण्यात येत असलेले प्राथमिक मानधन | सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय केलेली वाढ टक्केवारी | दिनांक १.१०.२०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार मानधनाचा प्राथमिक दर |
|---|---|---|---|---|---|
| **ब)** अंगणवाडी मदतनीस | १० वर्षापर्यंत | २५०० | १००० | ० | ३५०० |
| | ११ ते २० वर्षे | २५०० | १००० | ३% | ३६०५ |
| | २१ ते ३० वर्षे | २५०० | १००० | ४% | ३६४० |
| | ३१ वर्षावरील | २५०० | १००० | ५% | ३६७५ |

| **संवर्ग** | सेवा कालावधी | आता अनुज्ञेय प्रतिमाह प्राथमिक मानधन | आता वाढविण्यात येत असलेले प्राथमिक मानधन | सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय केलेली वाढ टक्केवारी | दिनांक १.१०.२०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार मानधनाचा प्राथमिक दर |
|---|---|---|---|---|---|
| **क)** मिनी अंगणवाडी सेविका | १० वर्षापर्यंत | ३२५० | १२५० | ० | ४५०० |
| | ११ ते २० वर्षे | ३२५० | १२५० | ३% | ४६३५ |
| | २१ ते ३० वर्षे | ३२५० | १२५० | ४% | ४६८० |
| | ३१ वर्षावरील | ३२५० | १२५० | ५% | ४७२५ |

३. ज्या अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका सेवेत आहेत परंतू त्यांनी दिनांक १/१०/२०१७ रोजी सेवेची सेवा १० वर्षे पुर्ण केलेली नाहीत त्यांना सेवाजेष्ठता आधारे निश्चित केलेली ३%, ४% व ५% मानधनात वाढ अनुज्ञेय रहाणार नाही. परंतू त्या सेवाजेष्ठतेनुसार सेवेच्या टप्यात आल्यानंतर ३%, ४% व ५% मानधनात अनुज्ञये राहील.

४. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे सेवासमाप्तीचे वय **दिनांक १/४/२०१८** पासून राज्य शासनाने ६५ वर्षावरुन ६० वर्षे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे ज्या अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांनी दिनांक १/४/२०१८ रोजी वयाची ६० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा पुर्ण केलेली आहेत त्यांची सेवा दिनांक १/४/२०१८ नंतर मानधनी सेवेतून समाप्त करण्यात यावी.

५. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सन २०१७-१८ पासून भाऊबीज भेट रक्कमेत वाढ करुन ती रुपये २०००/- करण्यात येत आहे.

६. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात तसेच भाऊबीज रक्कमेत वाढ केल्यामुळे अतिरिक्त आवश्यक निधी सर्वसाधारण योजनेमधुन नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करुन घेण्यात येईल..

७. सदर शासन मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २१ डिसेंबर २०१७ रोजीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२६१४५४१०५०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.02.26 16:06:24 +05'30'

**(ला.रा.गुजर)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री,मंत्रालय,मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता,महाराष्ट्र विधानसभा,विधामंडळ,मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेता,महाराष्ट्र विधानपरिषद,विधानमंडळ,मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
८. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
९. अपर मुख्य सचिव ( वित्तीय सुधारणा),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१०.अपर मुख्य सचिव ( नियोजन.),नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
११.सचिव (महिला व बाल विकास विभाग), मंत्रालय, मुंबई

१२. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
१४.आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५.महासंचालक,माहिती व प्रसिध्दी,मंत्रालय,मुंबई
१६.सर्व मंत्रालयीन विभाग
१७.सर्व विभागीय आयुक्त
१८.सर्व जिल्हाधिकारी
१९.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०.सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
२१.सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२२.सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हापरिषद)
२३.सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी )
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
२५.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२२. महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२७. महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
२८. निवड नस्ती (कार्यासन ६)